Vol 6 Issue 5 Nov 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor :4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 5 | November - 2016

Golden Research Thoughts

# महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण योजना आणि त्याची फलश्रृती

प्रा. श्रीमती डॉ. चव्हाण एस. आर.
अर्थशास्त्र विभाग, आर.बी.एन.बी. कॉलेज, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

## प्रस्तावना :–

आदिशक्तीचे रूप म्हणजे स्त्री ! फार पूर्वी वेद अध्ययनात गार्गी - मैत्रेयी अग्रेसर होत्या. मध्यंतरीच्या काळात स्त्रीचा प्रवास क्षीण झाला. स्त्री म्हणजे फक्त सेवा करणारी राहिली. घरात व शेतात राबताना ज्ञानाचे भांडार तिच्या पासून दूर राहिले. ब्रिटिशांच्या काळापासून स्त्रियांच्या स्थितीत हळूहळू सुधारणा होत गेली. याचे कारण याच काळात स्त्रीला शिक्षणाच्या प्रकाश वाटा दाखविणारे अनेक महात्मे येथे जन्मले. उदा. स्त्री –शिक्षण पुरस्कर्ते स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, महात्मा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या सावित्रीबाई फुले व इतर अनेक व्यक्ती की, ज्यांनी 'अबला' समजल्या गेलेल्या स्त्रीला 'सबला' बनविण्यासाठी अथक प्रयत्न केले.

समाजरूपी रथ विकासाकडे दौडवायचा असेल तर 'पुरूष' रूपी चाकोसोबत 'स्त्री' रूपी चाकालाही विकासाची तेवढीच चालना मिळणे गरजेचे आहे, एवढेच नव्हे तर –

'सुशिक्षित आई, पूर्ण कुटुंबाला पुढे नेई' जिजाबाईंनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडविले म्हणून महाराष्ट्रला स्वराज्याचे कोंदणे मिळाले. हाच जिजामाता पुरस्कार मिळविणाऱ्या श्रीमती माशेलकर यांनी आपल्या मुलाला (डॉ. रघुनाथ माशेलकर) 'आंतरराष्ट्रीय जागतिक कीर्तीचा एक शास्त्रज्ञ' म्हणून घडविताना अतोनात कष्ट घेतले. आपण भारतीय संस्कृतीत महिलांना 'लक्ष्मी मानतो, पण तिच्या हातात आर्थिक सत्ता देत नाही. महिलांना आपण सरस्वती मानतो, पण मुलींच्या शिक्षणावर खर्च करणे आपल्याला भविष्याची गुंतवणूक वाटत नाही. महिलांना आपण 'रणरागिणी' म्हणतो. पण तिला व्यक्त होण्याचे, स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य आपण देत नाही. तिच्या श्रमाची गणना अनुत्पादक श्रमांमध्ये होते.'

*'समान मानव माना – स्त्रीला,*
*तिची अस्मिता खुडू नका,*
*दासी म्हणून पिटू नका.*
*वा देवी म्हणूनी भजू नका.'*

कविवर्य कुसुमाग्रजांच्या या काव्यपंक्तीतून स्त्रियांबाबत समाजात व्यक्त होत असलेल्या वर्तणुकीची अपेक्षा स्पष्ट होते. भारतीय स्वातंत्र्याला ६० वर्षे उलटून गेल्यावरही समाजात स्त्रीच्याबाबतीत समानतेचा दृष्टिकोन अपेक्षेप्रमाणे विकसित होऊ शकला नाही ही खेदाची बाब आहे. ८ मार्चला आपण सर्वजण दरवर्षी 'जागतिक महिला दिन' मोठ्या उत्साहात साजरा करतो. निरनिराळे कार्यक्रम होतात. व्याख्याने होतात पण खरंच महिलांचा विकास, महिलाचं सक्षमीकरण होत आहे का? हा प्रश्न उपस्थित होतो.

## अभ्यास विषयाची उद्‌दिष्टये :–

१.महाराष्ट्र सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी कोणती धोरणे आखली हे अभ्यासणे.
२.महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या योजना अभ्यासणे.
३.या योजनांद्वारे महिलांचे सक्षमीकरण झाले आहे का हे अभ्यासणे.

## संशोधन पद्धती :–

हा संशोधन पेपर दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहेत. विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, महाराष्ट्र शासनाचे निर्णय ७३ वी घटना दुरूस्ती, संकेत स्थळावरील माहिती यांचा वापर करून सदर संशोधन पेपर तयार करण्यात आला आहे.

भारतीय संविधानानाने दिलेले मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्त्वे हा स्त्रियांच्या विकासाचा पाया आहे. राज्यघटनेत महिला आणि समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष कायदे करण्याची तरतूद आहे. महिलांकडे बघण्याचा शासनाचा आणि समाजाचा दृष्टिकोन प्रामुख्याने कल्याणकारी उपक्रमांचा लाभार्थी असाच राहिला



आहे. तरीही महिला या विकास प्रक्रियेचा अविभाज्य घटक बनल्या नाहीत. दारिद्रय, कुपोषण, बालमृत्यू दर, त्यातही गर्भलिंग निदान चाचणी, महिला आणि मुलींची विक्री आणि विविध स्तरावरील भिन्न स्वरूपाचा हिंसाचार या समस्या देशात उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यानंतरच अधिक वाढल्या. संयुक्त राष्ट्राने जागतिक पातळीवर महिलांच्या समस्या लक्षात घेऊन १९७५ हे वर्ष प्रथमतः महिला आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून जाहीर केले. नंतर १९७९ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने महिलांबाबत होणारे सर्व प्रकारचे भेदभाव दूर करणे आणि आपल्या न्यायव्यवस्थेत समानतेचे तत्त्व समाविष्ट करणे, असा ठराव संमत केला. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण व नंतर २००१ मध्ये विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री असताना दुसरे महिला धोरण जाहीर केले. या दोन्हीही धोरणांमध्ये प्रामुख्याने महिलांवरील अत्याचार, हिंसा, महिलांविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसार माध्यमांची भूमिका, महिलांना केंद्रस्थान मानून नियोजन, स्वयंसहाय्यता बचत गटांचा विकास, महिलांविषयीचे हक्क व कायदे याबाबत जनजागृती यावर प्रामुख्याने भर दिला. याचे फलित काही प्रमाणात असले तरी महिला सक्षमीकरणाच्या रूपाने दिसत आहे.

दुसरे धोरण जाहिर होऊन बरीच वर्षे लोटली आहेत. त्यामुळे २१ व्या शतकातील बदलती परिस्थिती, पुढे आलेल्या नवीन बाबी, आव्हाने यांचा विचार करून महिलांच्या धोरणांमध्ये सुधारणा करणे गरजेचे होते. कारण एकीकडे महिलांमधील शिक्षणाचे व अर्थाजनाचे वाढलेले प्रमाण ही बाब सकारात्मक असली तरी दुसरीकडे दर हजार पुरूषांमागे त्यांचे घटलेले प्रमाण, महिलांवरील झालेल्या हिंसाचाराच्या घटना या क्लेशकारक आहेत. या काळात सामाजिक, आर्थिक, राजकीय स्थितीत तसेच नागरिकांच्या मानसिकतेत अनेक बदल घडून आले आहेत. त्या बदलांशी सुसंगत अशा तिसऱ्या धोरणाचा मसुदा २०१३ मध्ये शासनाने प्रकाशित केला व नंतर अंतिम धोरण तयार करण्यासाठी ७ मे २०१३ रोजी मंत्र्यांच्या महिला व बालविकास अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. पुढे समितीने आपला अहवाल सादर करून ५ फेब्रुवारी २०१४ रोजी मान्यता दिली व त्याबाबतचा शासन निर्णय १ मार्च २०१४ रोजी जाहीर केला.

### *तिसऱ्या महिला धोरणाची उद्दिष्टये :–*

१.महाराष्ट्रातील महिलांच्या सर्वांगीण विकास व सक्षमीकरणासाठी प्रागतिक दृष्टिकोन रूजविणे व पुरूषप्रधान मानसिकता बदलणे.
२.महिलांना त्यांच्या अग्रक्रमानुसार आयुष्य जगता यावे यासाठी सर्व क्षेत्रांमध्ये समानसंधी व त्यांना आपले उद्दिष्ट साध्य करता यावे यासाठी आवश्यक पोषक वातावरण व साधने उपलब्ध करून देणे.
३.स्त्री–पुरूष जन्मदर समान ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे.
४.महिलांच्या पारंपारिक प्रतिमेला छेद देऊन आधुनिक व स्वबळावर उभी असणारी नवी प्रतिमा तयार करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करणे व गृहिणीच्या घरकामाला प्रतिष्ठा मिळवून देणे.
५.शासनाच्या सर्व स्तरावरील निर्णय प्रक्रियेत समाजातील सर्व महिलांच्या हिताचे व हक्कांचे संवर्धन करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.
६.समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकल्या गेलेल्या एकल स्त्रिया, देवदासी, देहविक्री करणाऱ्या महिला, लोककलावंत महिला आणि तृतीयपंथी यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे.
७.महिलांवर अन्याय करणाऱ्या अनिष्ट प्रथेपासून त्यांची मुक्तता करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.
८.समाजाच्या विषमतामूलक रचनेमुळे, विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जाती – जमातीतील व अल्पसंख्यांक समुदायातील महिलांवर होणारे अन्याय दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.
९.असंघटीत क्षेत्रातील कार्यरत महिलांच्या हक्कासाठी प्रयत्न करणे.

अशी विविध धोरणे महिलांच्या हक्कासाठी, विकासासाठी महाराष्ट्र शासनातर्फे आखण्यात आली.

महिलांना त्यांचा हक्क व अधिकाराबाबत जागृत करून त्यांचा विकास करण्यासाठी त्यांना सक्षम करण्याची प्रक्रिया म्हणजेच लैगिंक सबलीकरण. यासाठी विविध उपक्रम शासकीय व छळब पातळीवर राबविले जातात.

महाराष्ट्रात महिला व बालकांचा विकास वेगाने व परिणामकारकपणे साधण्यासाठी महिला व बालकल्याण हा स्वतंत्र विभाग राज्यात जून १९९३ मध्ये निर्माण करण्यात आला. पुढे त्याचे रूपांतर व बालविकास मंत्रालयात करण्यात आले. महिला आणि बालकांच्या सबलीकरणासाठीचे धोरण ठरविणे, योजना आखणे, राज्य सरकार व इतर संस्थांना मार्गदर्शन करणे यासाठी ३० जानेवारी २००६ रोजी महिला बालविकास मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. २०११ च्या जनगणनेनुसार १२१ कोटी लोकसंख्येत महिलांची संख्या ५९ कोटी आहे. तर पुरूषांची संख्या ६२ कोटी २००१–११ या दशकात महिला लोकसंख्येतील वाढ १८.१२ टक्क्यांनी झाली. तर पुरूष लोकसंख्येतील वाढ १७.१९ टक्के झाली. दरहजारी महिलांची संख्या ९४० असून महिला साक्षरता दर ६५ टक्के आहे.

### *महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या योजना :–*

१. सबला / राजीव गांधी किशोरी सबलीकरण स्कीम :–
२०१० मध्ये सुरू झाली. सुरूवातीला देशातील २०० जिल्हयातील अंगणवाडी केंद्रात हा कार्यक्रम सुरू करण्यात आला.
२.एकात्मिक बाल संरक्षण योजना :–
३१ डिसेंबर २०१० पर्यंत देशातील १४ लाख अंगणवाडी केंद्रामध्ये हा कार्यक्रम सुरू असून लाभार्थी संख्या ९.२० कोटी, त्यात ७.५२ कोटी बालके, तर १.६८ कोटी गर्भवती व स्तन्यदा माता असे लाभार्थी आहे.
३.इंदिरा गांधी मातृत्व सहकार्य योजना :–

२०१० –११ पासून ५२ समुदाय विकास कार्यक्रमांतर्गत चालू सध्या देशातील १४ लाख महिलांना त्याचा लाभ मिळाला.
४.नॅशनल मिशन फॉर एमपॉवरमेंट ऑफ वुमेन :– ८ मार्च २०१० रोजी सुरू झाली.
५.उज्ज्वला :–
डिसेंबर २००७ पासून सुरू झाली ही योजना महिलांना संरक्षण व देहव्यापर विरोधी सुरक्षा देणार कायदा करून करण्यात आली.
६.राष्ट्रीय महिलांना सबलीकरण योजना :–
(२००१) महिलांना त्यांच्या गरजांबाबत जागरूक करून त्यांची प्रगती विकास या संबंधीची रूपरेषा तयार करण्यासाठी हे धोरण जाहिर झाले.
७.जेंडर बजेट :–
स्त्री–पुरूष समानता आणण्याच्या हेतूने बजेटिंग फॉर जेंडर इक्विटी मिशन स्वरूपात २००४–०५ मध्ये सुरू करण्यात आली.
८.राजीव गांधी स्कीम फॉर एमपॉवरमेंट ॲडल्स ॲड गर्ल्स :– नोव्हेंबर २०१० मध्ये ही योजना सुरू करण्यात आली.
९.धनलक्ष्मी स्कीम :– मार्च २००८ पासून सुरू करण्यात आली.
१०.बालबंधू :– ही २०११ मध्ये सुरू झाली.
११.सेंट्रल ॲडॉप्शन रिसोर्स एजन्सी :– २८ जून १९९० पासून कार्यरत आहे.
१२.स्वाधार स्कीम :–

गंभीर परिस्थितीचा सामना करणाऱ्या महिलांना मदत केली आहे. परित्यकत्या, जेलमधून मुक्त झालेल्या महिला, वेश्यालयातून मुक्त झालेल्या महिला, यांना भोजन, निवास, आरोग्य आणि कायदेशीर मदत सामाजिक व आर्थिक पुनर्वसन महत्त्वाचे आहे.

१३.स्त्री शिक्षणाचा प्रसार व प्राधान्य :–

देशाच्या एकूण लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण सुमारे ४८ टक्के आहे, परंतु त्यांची साक्षरता ६५ टक्के आहे. त्यामुळे स्त्री शिक्षणाचा प्रसार वेगाने कला पाहिजे. शिक्षणामुळे येणाऱ्या जाणिवेतून व वैचारिक समृद्धतेतून कमी अपत्यांना जन्म देण्याची प्रवृत्ती स्त्रीमध्ये वाढत जाते. उच्च शिक्षण व कमी जननक्षमता यांचा परस्परसंबंध आहे. निरक्षर असलेल्या किंवा प्राथमिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांच्या जिवंत अपत्यांची संख्या ६.६ होती, तर माध्यमिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांच्या अपत्यांची संख्या ५.०, उच्च माध्यमिक ४. ६, विद्यापीठीय २.० एवढी होती. त्यामुळे स्त्री शिक्षणाचा प्राधान्य व प्रसार करणे आवश्यक आहे. शासन मुलींच्या शिक्षणात महत्त्वाचा वाटा उचलत असले तरी, मुलींना मोफत शिक्षण, वसतिगृह दुर्बल घटकांतील मुलींना आर्थिक मदत देऊन या कार्यक्रमास गती प्राप्त करून देऊ शकेल.

१४.सवित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना :–

दोन कन्याच्या जन्मानंतर कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या प्रोत्साहनपर राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र देण्यात येतात. राज्याच्या नवीन लोकसंख्या धोरणानुसार सवित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेत १ एप्रिल २००० पासून बदल झाला आहे. एक किंवा दोन मुली असताना व मुलगा नसलेल्या आणि नसबंदी शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या दारिद्रय रेषेखालील जोडप्यांना सदर योजना लागू आहे.

१५.गर्भजल चिकित्सेच्या चाचणीवर बंदी :–

वैद्यकशास्त्रतील प्रगती व विकासामुळे मुलाचा प्रत्यक्ष जन्म होण्याच्या बराच काळ आधी मुलांचे लिंग निश्चित करण्यासाठी चाचणी सुविधा फार मोठया प्रमाणावर उपलब्ध आहेत. मुंबई सारख्या शहरामध्ये मोठया संख्येने वैद्यकीय व्यावसायिक जन्मपूर्व गर्भलिंग परीक्षा, सी.व्ही.बी. अल्ट्रासोनोग्राफी यासारख्या चाचण्या करीत असतात. चाचणीमध्ये मुलीचा गर्भ आढळून आल्यास गर्भपात केला जातो. असे गर्भपात करून घेणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत आहे. या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी 'महाराष्ट्र प्रसवपूर्व निदान तंत्राच्या वापराचे विनियमन अधिनियम १० मे १९८८ पासून संपूर्ण राज्यात अंमलात आहे.

तसेच संयुक्त राष्ट्र महिला कोष आणि टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सच्या सहकार्याने राज्यातील काही पोलीस ठाण्यांमध्ये महिला व बालकक्ष सुरू करण्यात आले आहेत. हे कक्ष तक्रार नोंदणीचं काम करतानाच पीडित महिला आणि बालकांना आश्रय मिळवून देणे, कौटुंबिक समस्यांचे निराकरण करणं यासारखी कामं करत आहेत. महिलांवरील अत्याचारांची प्रकरणे निकाली काढण्यासाठी अकोला, अहमदनगर, अमरावती, औरंगाबाद, बुलढाणा, बीड, जळगाव, नागपूर, यवतमाळ, कोल्हापूर, रायगड आणि ठाणे येथे प्रत्येकी एक अशी १२ विशेष न्यायालय सुरू करण्यात आली आहेत. विकासाबाबत एवढे असले तरी महिलांच्या संदर्भात लिंगभेद, मुलींचे महिलांचे पालन–पोषण, तिच्या समान हक्काचं रक्षण बाबतीत बरंच काही करण्यास वाव आहे.

मुलींच्या आरोग्य संदर्भात पोषण आहाराच्या कमतरतेमुळे निर्माण होणारे आजार, रक्तक्षय, बालविवाह व लगेच प्राप्त होणारे मातृत्व, सततची गर्भारपणे हे लक्षात घेऊन शासनाने 'मातृत्व अनुदान योजना, 'जननी सुरक्षा योजना, यासारख्या योजना राबवून महिलांच्या आरोग्य रक्षणासाठी पावलं उचलली आहेत. बालविवाह, त्यानंतर येणारे मातृत्व व त्यातून निर्माण होणारं माता–बालकांमधील कुपोषण हे एक दृष्टचक्र आहे. 'चला मुलींचे स्वागत करू या' यासारखी किंवा 'पहिले तार मुलीला' यासारखी नाविन्यपूर्ण कल्पना राबवून आज राज्यात मोठया प्रमाणात जनजागृती होत आहे. 'किशोरी शक्ती' या योजनेअंतर्गत ११ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींना पोषण, आरोग्यविषयक दर्जा, स्वच्छता, अनौपचारिक शिक्षण, घरगुती व व्यावसायाभिमुख प्रशिक्षण दिलं जात आहे. तसेच महिला बचत गटांना ४ टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था शासनानं केली आहे. राज्यात २६ नोव्हेंबर हा दिवस हुंडाबंदीदिन म्हणून साजरा केला जात असून हुंडा देणं व घेणं हा कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला आहे. 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक' कायद्याची अंमलबजावणी राज्यात सुरू आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिंक छळ होऊ नये म्हणून 'विशाखा गार्डन लाईन्स' ची अंमलबजावणी राज्यात सुरू आहे.

यासाठी राज्यभर तक्रार निवारण समित्यांची स्थापना करण्यात आली असून महिला, मुली आणि बालकांचा अवैध मानवी व्यापार रोखण्यासाठी 'राज्य कृतिदला' ची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात 'देवदासी प्रतिबंधक कायदा' मंजूर करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी चालू आहे. शेतकरी आणि शेतमजूरांच्या मुलींच्या विवाहासाठी 'शुभमंगल सामुहिक विवाह' योजनेसारखी उपयुक्त योजना राज्यभर राबविली जात असून त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

अलिकडच्या काळात 'महिला समुपदेशन केंद्र' नावाची खूप चांगली योजना शासनाने राबविण्यास सुरूवात केली आहे. राज्यात गृहविभागाच्या अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली हे कृतिदल स्थापन झाले असून मुंबईत टाटा समाजविज्ञान संस्थेच्या मदतीने महिलांसाठी समुपदेशन केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. 'जिजामाता महिला आधार विमा' योजनेअंतर्गत केशरी आणि पिवळया शिधा पत्रिकाधारक कुटुंबातील २१ ते ७० वयोगटातील कुटुंब प्रमुखाचे अपघाती निधन झाल्यास त्याच्या विधवा पत्नीस अथवा मुली-मुलांस २५ हजार रूपयांचे एकरकमी अर्थसहाय्य 'नॅशनल विमा कंपनीकडून' देण्यात येते. अशा प्रकारच्या योजना महिला सक्षमीकरणासाठी शासनाने योजल्या आहेत.

## *फलश्रृती / निष्कर्ष :–*

महिला सक्षमीकरणासाठी असलेल्या या धोरणांचा व या विविध योजनांचा लाभ महिलांना मिळाला तर त्या खऱ्या अर्थाने सक्षम होतील व प्रत्येक महिला– 'नव्या युगाची महिला मी, आहे समर्थ मी, जगेन माणूस म्हणूनी' असे आत्मविश्वासपूर्वक म्हणू शकेल. आज सर्वच क्षेत्रे पादाक्रांत केलेल्या महिलांकडे पाहिलं तर महिला पुरूषांपेक्षा कुठेही मागे नाहीत. खचितच त्या त्यांच्यापेक्षा काकणभर सरसच आहेत असं आपल्याला दिसून येतं. 'वंशासाठी दिवा' म्हणून मुलाचा आग्रह धरणाऱ्या कुटुंबात मुलीच आईवडिलांचा मोठा आधार होताना दिसत आहेत. परिवर्तनाचे हे सगळं वारं वाहत असताना आणि शासन मुलींच्या – महिलांच्या विकासाशी कटिबद्ध असताना कोवळया कळयांना उमलू देणं आणि त्यांची जपवणूक करून त्यांना सक्षम बनविणे हे आपल्या सर्वांचं कर्तव्य ठरतं.

अर्थात सर्व क्षेत्रात महिलांना समान संधी व समान स्थान मिळण्याकरीता महिलांसाठी केलेल्या सर्व कायदेशीर तरतुदींनी आणि कार्यक्रमांची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे गरजेचे आहे. तेव्हाच महिलांना समाजाचा एक परिपूर्ण आणि समाजन घटक म्हणून समान स्थान मिळेल आणि खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण होण्यास हातभार लागेल.

## *संदर्भसूची :–*

१.घोडके अमोल लक्ष्मण, भारतातील मानव संसाधन विकास, द युनिक ॲकॅडमी प्रकाशन (एप्रिल २०१३)
२.राज्यसेवा मुख्य परीक्षा सामान्य अध्ययन पेपर ४, स्टडी सर्कल पब्लिकेशन लिमिटेड.
३.प्रा. डॉ. ब्रिजमोहन दायमा, प्रा. सौ. माधवी कवी, विद्या भारती, विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, परिविक्षा अधिक्षक, सहाय्यक आयुक्त परीक्षा मार्गदर्शक विद्याभारती प्रकाशन.
४.तुकाराम जाधव, महाराष्ट्र वार्षिकी २०१५ युनिक ॲकॅडमी (२०१५)
५.सौ. निर्मला ला. बऱ्हाटे, शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे (मार्च २०१५)

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org